advt17

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,
**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**

## कृषी विद्यापीठातील पदव्युत्तर पदवी प्रवेश सूचना

महाराष्ट्र राज्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी व डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली या चारही कृषी विद्यापीठांतर्गत सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाकरिता सर्व पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेमार्फत केंद्रीय पध्दतीने राबविण्यात येत आहे.

**उपलब्ध विद्याशाखा**

| | |
|---|---|
| (१) एम्.एस्सी.(कृषी) | (२) एम्.एस्सी.(उद्यानविद्या) |
| (३) एम्.एस्सी. (वनशास्त्र) | (४) एम्.एफ्.एस्सी. (मत्स्यशास्त्र) |
| (५) एम्. टेक्. (अन्नतंत्र) | (६) एम्.एस्सी. (कृषी जैवतंत्रज्ञान) |
| (७) एम्. बी. ए. (कृषी) | (८) एम्. टेक्. (कृषी अभियांत्रिकी) |
| (९) एम्. एस्सी. (ऑनर्स) (गृहविज्ञान) | (१०) एम्.एस्सी. (काढणी पश्चात व्यवस्थापन) |

सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि. पुणे (केटीपीएल) यांचेद्वारा ऑनलाईन पध्दतीने पूर्ण करण्यात येत आहे. यासाठी प्रवेश माहिती पुस्तिका कृषी परिषद व 'केटीपीएल' च्या अनुक्रमे **www.mcaer.org** किंवा **maha-agriadmission.in** या संकेतस्थळांवर **दि. ३० जुलै,२०१९ पासून उपलब्ध करून देण्यात येत आहे.**

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी अवलंबवावयाची कार्यपध्दती-**

- उमेदवारांने **maha-agriadmission.in** या संकेतस्थळाद्वारे **दि. ०९ ऑगस्ट,२०१९ पर्यंत** ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावा. यानंतर प्रवेश अर्ज भरण्याची सुविधा संकेतस्थळावर उपलब्ध नसेल.
- 'ऑन लाईन' भरतांना उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र, उमेदवाराची स्वाक्षरी, आवश्यक ती संबंधित कागदपत्रे स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड करावीत.
- **प्रवेश अर्ज किंवा कागदपत्रे हातबटवडयाने / टपालाने / कुरीअरने पाठवू नयेत.**
- प्रवेश अर्ज भरतेवेळी प्रवेश अर्जाचे शुल्क डेबिट कार्ड, क्रेडीट कार्ड किंवा नेट बँकीगद्वारे भरावे.

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी भरावयाचे शुल्क-**

खुल्या प्रवर्गासाठी रु. १५००/-

आरक्षित प्रवर्गासाठी रु. ७५०/- (अ.जा., अ.ज., वि.जा*, भ.ज*, इ.मा.व*, वि.मा.व*.,सा.व शै.मा.व. *, आ.दु.घ. )

[सा.व शै.मा.व., आ.दु.घ. वगळता जात वैधता प्रमाणपत्र अनिवार्य. तसेच *उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य. आ.दु.घ. करिता तहसीलदार यांचे प्रमाणपत्र.]

प्रवेश क्षमता, आरक्षण इत्यादी सविस्तर तपशिलाचा अंतर्भाव असलेली प्रवेश माहिती पुस्तिका उपरोक्त संकेतस्थळांवर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

क्र. मकृप/शिक्षण-१/३२१९/१७३९
दिनांक-२२ जुलै,२०१९

(आर. बी. भागडे भा प्र से)
**महासंचालक**
महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे

Scanned by CamScanner